
# नवनीत

मे २०१२



# मुखपृष्ठाविषयी

गोधडी शिवणे ही एक पारंपरिक कला आहे. शाश्वत राहणीचे आणि एकमेकाला हातभार लावत काम करण्याचे एक उत्तम उदाहरण आहे.

जुन्या, फाटलेल्या कपड्यांमधील कापडाचे तुकडे एकाला एक जोडून गोधडी तयार होते. गोधडीचा टाका अगदी सोपा, धावदोऱ्यासारखा असतो. यात कौशल्य असते ते तुकडे जोडताना गोधडीचा एकूण आकार बिघडू न देण्यात. गोधडीच्या सुयाही नेहमीच्या सुईपेक्षा लांब व दोरा नेहमीच्या दोऱ्यापेक्षा जाड व मजबूत असतो.

हल्ली गोधडीची फॅशन झाल्यामुळे कोऱ्या कापडाचे तुकडे जोडून नवी कोरी गोधडी बाजारात विकायला येते. पण वापरून वापरून मऊ झालेल्या आणि आठवणींनी सजलेल्या गोधडीची ऊब काही वेगळीच असते.

कापडाचे अगदी एका आकाराचे त्रिकोणी किंवा चौकोनी तुकडे कापून त्यात सारणासारखा कापूस भरून समोसे तयार करून एकमेकाला जोडून बनवलेल्या गोधड्या परदेशात मिळतात. कमलाबाई निमकर आपली लहानपणची आठवण सांगत की विजेचा फारसा प्रसार झालेला नव्हता त्या काळात रात्रीची जेवणे झाल्यावर एक-दोन मेणबत्त्या लावून गोधडी शिवण्याचा कार्यक्रम चाले. आळीपाळीने कोणीतरी एकजण त्यावेळी कादंबरी वाचून दाखवी व मग त्यावर गप्पा होत. कुटुंबाने एकत्र येऊन अशाप्रकारे काहीतरी काम व मनोरंजन करण्याने गोधडीसारखेच कुटुंबातले वेगवेगळे घटक घट्ट जोडायला मदत होत असे.

कमला निंबकर बालभवनमध्ये गोधडी शिवण्याचा एक नवा उपक्रम या वर्षीपासून सुरू झाला आहे. यातून अर्थार्जन करणाऱ्या कामात याचे रूपांतर करण्याचा प्रयत्न राहील.

**मंजिरी निमकर**

## प्रगत शिक्षण संस्था, फलटण
## वार्षिक पत्रिका

# नवनीत

## मे २०१२

**संपादकीय सहाय्य**
मंजिरी निमकर वसीम मणेर
संज्योत उंडे कल्पिता दंडवते
प्रकाश अनभूले मधुरा मणेर

**रेखाचित्रे**
ऐश्वर्या भोकरे प्रांजली भुजबळ
ऋषिकेश कट्टे जितेंद्र काकडे
चेतन काकडे अक्षता मगर

**मुखपृष्ठ**
प्रांजली भुजबळ हर्षा भट्टड

**रेखाटन मार्गदर्शक**
सुशांत अहिवळे

**प्रकाशन** : प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३
**संगणकीय अक्षरजुळणी** : अपर्णा टाकसाळकर, प्रकाश अनभूले, कमला निंबकर बालभवन
**फोन** : ०२१६६-२२३०४१
**email** : pragatshikshansanstha@gmail.in
**website :** www.pragatshikshansanstha.org, www.cllcindia.org

# अनुक्रमणिका

प्रस्तावना/डॉ. मंजिरी निमकर/iii
वाचकाचे मनोगत/वसीम मणेर/iv
मिठाईवाला/जुनेद शेख, ५ वी/१
मनातल्या मनात/प्रसाद थोरात, २ री/२
मनातल्या मनात/प्रेम चव्हाणे, ३ री/३
माझे पोहणे/राजेश्वर शेवाळे, ५ वी/४
मेरा मन/अनुजा अहिवळे, ३ री/५
पाचवीच्या विद्यार्थ्यांचे पत्रलेखन /रेहान आतार, अभिनव मिरगणे, ५ वी/६
मांगूर आणि देवमासा/सूर्यजीत गुंजवटे, ५ वी/७
ढगांची शाळा/हर्षदा लोंढे, ३ रो/९
माझी आजी/अनिकेत पवार, ५ वी/९
मी कोण होणार?/अक्षता नवले, ५ वी/१०
वर्तमानपत्रे टाकणारा मुलगा/चेतन काकडे, ५ वी/११
मी पाहिलेला अपघात /मधुरा निंबाळकर, ५ वी/१२
स्वप्नातली परी/ओम चंकेश्वरा, ५ वी/१३
आमची मनू/श्रुती भोसले, ३ री/१४
सुट्टी संपली शाळा भरली /सिमरन पठाण, ८ वी/१५
माझी शाळा /शिवतेज अभंग, ८ वी/१५
When I Dialed 100/Samiksha Dixit, Standard 7/ १६
माझे बाबा/काजल सस्ते, ७ वी/१७
काडी पैलवान! नाही, बॉडी पैलवान!/विपुल गुंडगे, ८ वी/१८
गोट्या/निरंजन चोरमले, ६ वी/२०
धूलिवंदनाची मेजवानी/ऋषिकेश जाधव, ७ वी/२१
Mrutunjay/Akshata Magar, Standard 9/ २३
My First Cricket Match /Ruturaj Kadam, Standard 9/ २५
बैलांची शर्यत/कमलेश गुंजवटे, ८ वी/२५
My Grandma /Pranjali Bhujbal, Standard 9/ २७
पिसांच्या शोधात/अभिषेक शिंदे, ९ वी/२९
चाळ/प्रथमेश इनामदार, ९ वी/३३

# प्रस्तावना

नवनीतचा अंक तयार करणे हा नेहमीच एक संपन्न अनुभव असतो. मुलांच्या विश्वात हळूच डोकावण्याची ही एक संधी असते. नवनीतमध्ये थोडे संपादकीय बदल वगळता मुलांचे लिखाण शक्यतो जसेच्या तसे वाचकांसमोर ठेवले जाते. म्हणूनच कमलेशच्या 'बैलांची शर्यत' व निरंजनच्या 'गोट्या' या अनुभव कथनांमधून प्रमाण मराठीत कानावर न पडणारे अनेक शब्द आपल्याला आढळतात. अनुभवही अस्सल गावाकडचे आहेत.

वर्गात मुलांना विविध विषयांवर लेखन करायला प्रोत्साहन दिले जाते. आपल्या अगदी आतल्या मनातले विचारही मग मुले मांडतात. जसे प्रसाद आणि प्रेमने मांडले आहेत. अनुजाने आणि अक्षताने आपल्या मनातले विचार कवितेच्या रूपात व्यक्त केले आहेत. राजेश्वरने आपल्या पोहण्याच्या अनुभवाबद्दल लिहिले आहे. तर मधुराने आपण पाहिलेल्या अपघाताबद्दल. श्रुतीने आपल्या मांजरीची कहाणी लिहिली आहे, तर समीक्षाने कधी कधी मुलांच्या खेळाची किंमत मोठ्यांना कशी भरावी लागते याविषयी लिहिले आहे 'When I dialed 100' या कथेत.

अनिकेतचा 'माझी आजी' आणि प्रांजलीचा 'My Grandma' हे लेख मुलांच्या जीवनातील आजी-आजोबांचे स्थान अधोरेखित करतात. काजलचा 'माझे बाबा' हा आपल्या बाबांच्या धडपडीचा, कष्टाचा आढावा घेणारा लेख लहान मुलांची संवेदनशीलता दाखवितो. 'काडी पैलवान! नाही बॉडी पैलवान!' या लेखात विपुलने आपल्या कुस्तीच्या रिंगणातला अनुभव लिहिला आहे तर ऋषिकेशने 'धूलिवंदनाची मेजवानी' या लेखात समाजात रुढींच्या नावाखाली असणाऱ्या अंधश्रध्दांचा जन मानसावरील पगडा दाखविला आहे. एखादी उत्कृष्ट साहित्यकृती मुलांच्या मनाचा कसा कबजा घेऊ शकते ते अक्षताने रंगविले आहे आपल्या 'Mrutunjay' या पुस्तक परीक्षणातून.

जुनेदची 'मिठाईवाला' व सूर्यजीतची 'मांगूर आणि देवमासा' या दोन काल्पनिक कथा मनाला मोहवून टाकतात तर ऋतुराजचा 'My First Cricket Match' हा अनुभव मुलांच्या मनाचा सच्चेपणा आणि त्याला प्रोत्साहन देणारे पालक यांचे चित्र दाखवून मनाला दिलासा देतात. अभिषेकने आपला निसर्ग सहलीचा अनुभव आपल्या खुसखुशीत शैलीत रंगवला आहे आणि प्रथमेशने आपल्या 'चाळ' या अत्यंत अभ्यासपूर्ण लेखातून आपल्या वैयक्तिक अनुभवाशी चाळ-संस्कृतीची सांगड घालीत आपल्यातील खराखुरा लेखक प्रकट केला आहे.

अंकात सर्वत्र इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी दोन-दोन ओळींचे हिंदी शेर लिहून गंमत आणली आहे.

**डॉ. मंजिरी निमकर**

## वाचकाचे मनोगत

लहान मुलांची चित्रे आणि लेखन हे कायमच माझ्या प्रेरणेचे स्त्रोत राहिले आहेत. दरवर्षी नवनीतचा अंक मी हातात पडताक्षणी एकाहाती वाचून संपवतो आणि आवडलेल्या लेखनाचे पुन्हापुन्हा वाचन करतो. यावर्षी प्रकाशनपूर्व नवनीत पाहण्याची संधी मिळाली.

मुलांचे मन हे त्यांचा परिसर, त्यांचे समाजातले स्थान, आसपास घडणाऱ्या घटना, चालणारे जीवन, या साऱ्यांचे कळत नकळत टिपण घेत रहाते. प्रस्थापित व्यवस्थेत मुलांच्या मताला, अनुभवाला किंवा कथनाला फारसा वाव -भाव नसल्याने अशी टिपणे मनात दडून जातात. कालांतराने विरून जातात. मूल मागील पानावरून पुढे जगत जाते, वाढत जाते. मनही पुढे अशी 'बिनकामाची-निरुपयोगी' टिपणे घेणे बंद करते.

कमला निंबकर बालभवनमध्ये मुलांच्या संवेदनशील मनाने केलेल्या टिपणांचा ठाव घेण्याचा प्रयत्न नवनीतच्या माध्यमातून होतो. मुलांना लहान वयात कायद्याची फारशी समज नसते, योग्य अयोग्य याच्याही कल्पना फारशा पक्व झालेल्या नसतात. मन फक्त स्पंजप्रमाणे गोष्टी आसपासच्या वातावरणातून शोषून घेत असते. अशाचवेळी त्यांचे मन ज्या गोष्टींची दखल घेतेय त्याची आपण दखल घेणे आणि या साऱ्याची शिक्षणाशी सांगड घालणे किती महत्त्वाचे आहे हे मुलांचे लेखन वाचताना पदोपदी जाणवते.

कनिबामध्ये काळजीपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक जोपासलेली ही परंपरा मुलांच्या शिक्षणातील महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग आहे असे मला वाटते. इथे मुलांना स्वातंत्र्य आहे, अमुकप्रमाणे लिहायचे असे बंधन नाही. लेखनाचा आकृतीबंध जर वरून लादला नाही तर मुलांची सर्जनशीलता किती अमर्याद आहे हे मुलांच्या लेखनातून, आपण अचंबित व्हावे इतके स्पष्ट दिसते.

रंजक गोष्ट सांगणे हे प्रचंड अवघड काम आहे. हे अवघड काम ही मुले सहज करताना इथे दिसतात. हे करण्यासाठी त्यांना हवा असतो एक अवकाश, व्यक्त होण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी केलेल्या कामाची दखल घेतली जाईल असे आश्वासन! आणि ते ही शाळा त्यांना पुरविते.

**वसीम मणेर**
**माजी विद्यार्थी व फिल्ममेकर**

# मिठाईवाला

**जुनेद शेख**

**इ. ५ वी**

रामपुर गाँव में किसनराव नाम के एक हलवाई की दुकान थी। वह बहुत ही परिश्रमी और ईमानदार था। वह अपने पास की रक्कम से जितनी मिठाइयाँ बनती उतनी ही बनाता, और अच्छा और ताजा ही माल बेचता। सब गाँववाले उसकी मिठाइयाँ पसंद करते।

एक दिन वह रोजाना की तरह रात में मिठाइयाँ बनाकर दुकान में रखकर सो गया। सुबह उठकर देखा तो मिठाइयाँ गायब। दुकान में मिठाइयों की जगह पर सोने की मोहरें रखी हुई थी। उसे बडा ताज्जुब हुआ। यह सब कैसे हुआ ?

दूसरे दिन भी यही हाल रहा। फिर तीसरे दिन उसने मिठाइयाँ बनाई और दुकान में रख कर एक तरफ छुप कर बैठ गया। रात का कुछ हिस्सा गुजरने के बाद उसने देखा कि एक जीन आकर वह सब मिठाइयाँ खाकर उस जगहपर सोने की मोहरें रख कर चला गया। उसे किसन की मिठाइयाँ बहुत पसंद आइ थी।

अब किसन एक बहुत बडा व्यापारी बन गया। अब वह लोगों के लिए अलग मिठाइयाँ बनाता और जीन के लिए अलग। ■



# मनातल्या मनात

**प्रसाद थोरात**

**इ. ३ री**


मी एके दिवशी एकटाच बसलो होतो. माझ्या मनात एक विचार आला, आपण भात करावा. भात तर खूपच सोपाय. भात करायचा म्हटला तर तांदूळ पायजेत. मग म्हणलं, अरे तांदूळ संपले. आता काय करायचं? मग आजीला विचारलं, तांदूळ कुठे आहेत? आजी म्हणाली, थांब मी देते नीट करून.

मग एक विचार आला, भात किती टाकायचा? मोठ्या दोन वाट्या. मग मसाले भात करू का साधा? साधा केला तर भाताबरोबर काही खायला नाही. असा विचार करत मग मी मसाले भाताचं सामान घेतलं आणि भात शिजायला टाकला.

मग किती शिट्या कराव्यात? चार कराव्यात. चार शिट्या झाल्या. वाफ निघून गेली. कुकरचे झाकण उघडले. दोन डिश घेतल्या आणि त्यात भात काढला. एक डिश आजीला दिली आणि एक डिश मी खाल्ली.

मग एक विचार आला दिदीला ठेवायचा का? तेवढ्यात दिदी आली. मग दिदीने भात खाल्ला. पण कुकर दिदीने घासलाच नाही. त्याच्यामुळे मम्मी रागवली. मम्मी म्हणाली, कुणी केलता भात? मग मी म्हणालो, माझ्या मनात आलं म्हणून मी भात केला.

■



# मनातल्या मनात

**प्रेम चव्हाण**


**इ. ३ री**

मला कुणी मारले की माझ्या मनात येते मी त्याला मारू का? मम्मीने मारले की मला वाटते, मी मम्मीला वरडू का?

मला खेळताना घरामागची काट्याची झाडे तोडावी असे वाटते. कुत्र्याचे माणूस होवावे असे माझ्या मनात असते.

म्हातारी माणसे मरू नयेत असे माझ्या मनात असते. माझ्या मनात असते, लहान मुले शाळेत जावीत. माझ्या मनात असते लहान मुलांनी शिव्या देऊ नये.

माझ्या मनात असते, सगळी श्रीमंत असावीत. माझ्या मनात असते की देव अजून असावे आणि आपण देवाला सोने मागावे. माझ्या मनात असते गरीबाने श्रीमंत असावे. ■



# माझे पोहणे

राजेश्वर शेवाळे

इ. ५ वी


नुकत्याच परीक्षा झाल्या होत्या. उन्हाळ्याचे दिवस होते. कडक ऊन पडले होते. पप्पांनी मला विचारले पोहायला येतोस का? मी छाती फुगवून म्हणालो हो.

पप्पांबरोबर मी सकाळी सराफाच्या विहिरीवर गेलो. तेव्हा त्या विहिरीचे पाणी पाहून माझे हातपाय थरथर कापू लागले. पप्पांनी मला खाली ढकलले तेव्हा मी गटांगळ्या घालत खाली गेलो. पप्पांनी पटकन खाली उडी मारली. पप्पा खाली गेले व मी वर आलो. तिथल्या काकांनी, सोनवलकर सरांनी आणि माझ्या पप्पांनी मला पोहायला शिकवले. माझी भीती कमी झाली.

आठवड्याने मी पप्पांना म्हणालो पप्पा माझ्या पाठीवरील डबा काढा. पप्पांनी डबा काढल्यावर मला इतके नीट पोहता येत नव्हते. मी पाचवेळा खाली बुडलो. पप्पा म्हणाले बुडल्याशिवाय पोहायला येत नाही. नंतर मी नीट पोहायला शिकलो.

दर उन्हाळ्याच्या सुट्टीला मी महिनाभर पोहायला जातो. पोहायची भिती वाटत नाही. माझ्या पाठोपाठ माझ्या दोन बहिणी अपूर्वा व अंकिता पोहायला शिकल्या. त्यांनासुध्दा चांगले पोहायला येऊ लागले.

एके दिवशी मी पोहत असताना उडी मारायला लागलो तेवढ्यात माझा पाय वरून सटकला व मी खाली गेलो.



मग मी खालून पोहायला शिकलो. नंतर बटरफ्लाय व सूर मारायला शिकलो. एकदा बटरफ्लाय मारताना माझ्या अंगावर नवीन पोहायला शिकणारा मुलगा पडला. मी त्या ट्यूबला पकडले व त्या मुलाला पायरीपाशी आणून सोडले.

एकदा मी पण दुसऱ्या एका मुलाच्या अंगावर सूर मारला. पण आम्हाला दोघांनाही पोहता येत होते.


एकदा मी विहिरीच्या पायरीवर बसलो तेव्हा माझ्या हाताला खेकडा चावला. मी आऊ आऊ करायला लागलो. तेव्हा मला सगळेजण हसू लागले. त्या मुलांचा मला राग आला. मी मारामारी करायला निघालो. तेव्हा तिथले काका मला म्हणाले, भांडण करू नका. तेव्हापासून आम्ही एकत्र पोहायला जातो. मला पोहायला फार आवडते.

■

---

## मेरा मन

मन करता है... बिल्ली बनकर
सारे घर में धूम मचाऊँ!
मन करता है... चाँद पे जाकर
खूब मजा करूँ !
मन करता है... अंतराल मे जाऊँ
दिन रात उडूँ!
मन करता है...चंदा को बिस्तर बनाऊँ
बादल को अंग पे लपेटूँ!
मन करता है... शिक्षक बनकर
बच्चो को शिक्षा दूँ!
मन करता है... तितली बनकर
खूब फूलों के साथ खेलूँ!
मन करता है... रेलगाडी बनकर
झुक झुक करूँ!



**अनुजा अहिवळे**
**कक्षा तीसरी**

# पाचवीच्या विद्यार्थ्यांचे पत्रलेखन

प्रिय साजिद मामा और आस्मा मुमानी,

स.न.वि.वि.

मेरे मामू और मुमानी को मेरा सलाम। मामू मैं तुझे ईद मुबारक करता हूँ। मामू तेरी ईद की तयारी कैसी चली है? हमारी तयारी हुई भी। हमारे ताई ने हमको पत्र लिहीने को कहा था। मेरी बहन कैसी है तू ? मैं पाँचवी में जाकर इतना खुश हूँ ! मुझे दो विषय नये आये है। एक स्काऊट-गाईड और एक विषय तू पेहचान। हम पढते हैं जो....... अभी भी नहीं पेहचाना? हद् तू तो बुध्दूका बुध्दू रहेगा। अरे पागल दूसरा विषय हिंदी है !

मुमानी, आप आयान का ख्याल रखते हैं की नही? कितना खराब हुआ है। आप फलटण जरूर आना। सादिक, आयान अम्मी कू तकलिप दू नको।

मेरे मामू, मुमानी को सलाम।

आपका प्यारा,

**रेहान आतार**

**कक्षा पाँचवी**

प्रिय आजोबा,

आजोबा मला तुमची खूप आठवण येत आहे. आज तुमचा वाढदिवस आहे. तुम्हाला तुमच्या वाढदिवसाबद्दल हार्दिक शुभेच्छा. मी तुम्हाला येताना काय आणू? तुम्हाला काय आवडते ते सांगा.

तुम्ही आजीला सांगा की अभिनव येणार आहे, माझ्या आवडीचे बेसनाचे लाडू बनवून ठेव. आजोबा तुम्ही मला खूप आवडता. माझे प्रिय आजोबा.

**अभिनव मिरगणे**


**इ. ५ वी**

# मांगूर आणि देवमासा


**सूर्यजीत गुंजवटे**

**इ. ५ वी**


रात्रीची वेळ होती मला शांत झोप लागली होती. एका स्वप्नात मी मोठ्या समुद्रात गेलो. जास्त खोलवर गेल्यावर मला मांगूर मासा भेटला. त्याच्या मोठ्या-मोठ्या मिश्या पाहून आधी मी घाबरलो. पण मासा शांतपणे माझ्याजवळ आला. जेव्हा त्याने माझ्या हाताला तिडा मारला, एक डॉल्फिन मासा दिसला. तो होता शांत. पण त्याचे कारी नाक पाहून माझ्या अंगावर काटा फुटला. मांगूरने मला अजून पुढे नेले. पुढे जाताना मला एक तारामासा दिसला. मला तर आधी वाटले की तिथे पांढरे भूतच आहे. मग मला आणखी पुढे गेल्यावर एक सोन्याचा खजिना दिसला. इतके सारे सोने




तेव्हा माझ्या छातीचे ठोके वाढू लागले. पण त्याने मला जेव्हा ओढले तेव्हा मला पाण्यातील दोन-चार सोनेरी रंगाची कासवे दिसली. तेव्हा कोठे माझी भीती कमी झाली.

मी समुद्राच्या तळाशी गेलो तेव्हा मला पाहून माझे डोळेच दिपले. मी खजिन्याच्या जवळ जाताच आम्हाला खजिन्याचे रखवालदार म्हणून दोन भले मोठे मासे तिथे बसलेले दिसले. एक होता शार्क आणि दुसरा होता देवमासा.


यांना पाहून आम्ही दोघेही एका दगडामागे लपलो. आमच्या जवळून एक मासा चालला होता. शार्कची नजर त्या माश्यावर पडताच त्याने त्याला गिळून टाकले. ते बघून तर मला आणखीच भीती वाटू लागली.

तेथून एक खेकडा चलला होता. तो मला कच्चदिशी चावला. त्याक्षणी मी दगडामागून सरकलो आणि त्या दोघांनाही दिसलो. मांगूर मला आत ओढण्यासाठी बाहेर आला आणि मांगूरही त्यांना दिसला. ते दोघे आम्हाला ताणायला लागले. ते आमच्या मागे आले. शार्कने मांगूरला गिळले आणि देवमाश्याने मला. मी त्याच्या पोटात लोळू लागलो आणि कॉटवरून खाली पडलो. मग मला कळाले की हे तर माझे स्वप्नच आहे. ही हकिकत मी घरच्यांना सांगितली आणि सगळे हे ऐकून हसू लागले. ■

---

## ढगांची शाळा

आभाळात भरली
ढगांची शाळा
सारे ढग झाले
एकदम गोळा
त्यावर आपण समजायचे
जवळ आला पावसाळा
आता कमी झाल्या
उन्हाळ्याच्या झळा
आता नदी ओढे
वाहतील खळाखळा
मग बेडूक करतील
त्यामधी अंघोळा
म्हणून म्हणते मी
मला आवडतो पावसाळा




**हर्षदा लोंढे**
**इ. ३ री**

# माझी आजी

**अनिकेत पवार**

**इ. ५ वी**

माझ्या आजीचे नाव अनुसया आहे. तिचे वय ५५ आहे. ती खूप चांगली आहे. ती दररोज सकाळी लवकर उठते. ती प्रत्येक काम आवडीने करते. ती कधीही कामात कसर करत नाही. ती माझा खूप लाड करते.

सुट्टीत आम्ही तिच्याकडे गावी जातो. तेव्हा ती आम्हाला नवीन कपडे घेते. दररोज नवीन नवीन पदार्थ खाऊ घालते. तिथे गेल्यावर ती मम्मीला कोणतेही काम करू देत नाही. तिला कुठेही घाण झालेली आवडत नाही. ती नेहमी सर्व घर स्वच्छ ठेवते.


आजी सकाळी दहा वाजता भाजी भाकरी खाते. मधल्या वेळी फळे खाते. रात्री झोपताना कपभर दूध पिते. मर्यादित खाल्यामुळे तिची प्रकृती व्यवस्थित असते. ती आजोबांची व्यवस्थित काळजी घेते. ती आमच्याकडे आल्यावर आम्ही तिला राहण्याचा आग्रह करतो. परंतु ती रहातच नाही. कारण तिला शहरापेक्षा गावाला राहायला आवडते.

तिच्याकडे सतत पाहुणे येत असतात. परंतु तिला कधीच पाहुण्यांचा पाहुणचार करण्यास कंटाळा येत नाही. अशी प्रेमळ, कामात मग्न असणारी माझी आजी मला आवडते. अशी आजी सर्वांना मिळावी. ■

---

मैंने गमले में शेवंती, जिनिया लगाया
जो माँ को, दीदी को बहुत भाया ।
कुछ दिनों में उनमें फूल पीले-लाल आए
हर एक व्यक्ति 'बढिया!' कहता जाए ।

**अक्षदा फणसे**



## मी कोण होणार?

कोण होणार, कोण होणार,
कोण होणार मी?
हे ठरवणारे कोण तुम्ही?
बाबा म्हणतात इंजिनीअर,
आई म्हणते डॉक्टर
मला तर व्हायचंय पोलिस इन्स्पेक्टर
ठो ठो ठो ठो बंदूक चालवीन
चोरांची मी फॅ फॅ उडवीन
कॉपी कराल तर खबरदार!
जोरात चालवू नका कार.
असं स्वप्न पाहत आहे मी
मी अमुकच होणार हे ठरवणारे कोण तुम्ही?

**अक्षता नवले**
**इ. ५ वी**

---

यह है नीम की हरी पत्ती और डाली
जो देती है हमें गोंद, ऑक्सिजन और हरियाली।


**वृषाली धायगुडे**

# वर्तमानपत्रे टाकणारा मुलगा

**चेतन काकडे**

**इ. ५ वी**

खूप वर्षांपूर्वी रवी आमच्याकडे वर्तमानपत्र टाकायचा पण त्याची व माझी आधी ओळख झाली नव्हती. कारण तो जेव्हा त्याचे काम करून जाई, तेव्हा मी साखरझोपेत असे. पण महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बिल घ्यायला आल्यावर तो बऱ्याच वेळा गप्पा मारीत बसे. तेव्हा त्याची माझी ओळख झाली.




रवी त्या वर्षी बारावीत शिकत होता. त्याला अभ्यास खूप आवडे. घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे गेल्या वर्षीपासून रवी सकाळी वर्तमानपत्रे टाकत असे. त्याबद्दल त्याला दरमहा २०० रु. मिळत. शिवाय संध्याकाळी तो एका पुस्तकाच्या दुकानात कामाला जाई. त्याबद्दल त्याला ५०० रु. मिळत. संध्याकाळी दुकानात खूप गर्दी असे पण त्याला पुस्तके खूप आवडत असल्याने हे काम तो मनापासून करी. त्याला सकाळी लवकर उठावे लागे. या कामामुळे अनेक लोकांशी त्याचा परिचय झाला. त्यातील काहीजण त्याला अभ्यासात मदत करीत.

एके दिवशी तो सकाळी वर्तमानपत्र टाकत असताना पोलीस आले व त्यांनी त्याला पकडले. कारण पोलिसांना वाटले की रवीने चोरी केली होती. पण तो म्हणाला, मी नाही केली. तरीही त्याला पोलिसांनी गाडीत टाकले. तो जाता जाता म्हणत होता, माझ्याकडे २०० रु. तर काय १ रु. सुदाक मिळणार नाही. ते ऐकून मला खूप दुःख झाले. पण काय करावे काही सुचेना.

**पान १२ वर**

# मी पाहिलेला अपघात

**मधुरा निंबाळकर**
**इयत्ता ५ वी**

सकाळ झालेली होती. सकाळचे ६.४५ झाले होते. एक मुलगी तिच्या बहिणीला बॅचला सोडून येत होती. तिच्या स्कूटीसमोर एक कुत्रे आडवे आले. त्या कुत्र्याच्या पुढे स्पीडब्रेकर होता. पण तिला तो दिसला नसावा. त्यामुळे तिने एकदमच गाडीचा स्पीड खूप वाढवला. स्पीडब्रेकरवर वाळू होती. त्या स्पीडब्रेकरवरून ती उडाली. तिची गाडी उडून लाईटच्या खांबाला धडकली व ती मुलगी आमच्या घरासमोर उडून पडली.

बाबा, आई, काकी, काका, आण्णा सर्वजण बाहेर आले. सर्वांनी मिळून तिला आमच्या घरात आणले. तिला गादीवर झोपवले आणि कांद्याची धुरी दिली. तेव्हा कुठे तिच्या अंगातला वात गेला. तेवढ्यात आम्ही पवार डॉक्टरांना फोन केला होता. ते लगेच आले आणि तिला त्यांच्याच गाडीतून नेले.

दोन तीन दिवसांनी आई, बाबा, मी व दादा तिला भेटायला गेलो. तिला १३ टाके बसले होते. ती राजेंद्र वाकडमाने यांची मुलगी होती.

■

---

**वर्तमानपत्रे टाकणारा मुलगा पान ११ वरून**

आता तो इंजिनियर आहे. तो मला अधूनमधून बागेत घेऊन जातो. गप्पा मारतो. तो खूप हुशार आहे. आम्हा सगळ्यांना त्याच्यागत बनायला आवडेल. पूर्वी त्याला दोन्ही कामांमुळे महिन्याला ७०० रुपये मिळत होते पण आता त्याला २७००० रुपये मिळतात.

■

## स्वप्नातली परी

माझ्या स्वप्नात आली परी
ती होती खरी खुरी
तिने दिले मला एक संत्र
म्हणाले मी बोलून दाखव मंत्र
तिने म्हटले मंत्र चार
दारात आली मोठी कार
बसलो कारमध्ये मी आणि परी
कारने घेतली उंच भरारी
ढगावर जाऊन उतरली स्वारी
ढगावर ठेवला मी पाय
वाटत होते ढग म्हणजे साय
ढगातून पडले मी खाली
मला वाचवायला परी आली

**जान्हवी भुजबळ**

**इ. ५ वी**

## पंतग


पतंग पतंग आकाशात डोले
नागपंचमीच्या दिवशी मुलांशी बोले

आले रे आले वारे आले
आकाशात पतंग डोलू लागले

मुले उडवण्यात झाली दंग
पतंग काटण्याची लागली जंग

**ओम चंकेश्वरा**

**इ. ५ वी**



# आमची मनू

**श्रुती भोसले**

**इ. ३ री**

आमची एक मांजर आहे. तिचे नाव मनू आहे. ती आमची खूप लाडकी आहे. मनू नेहमी आमच्यासोबत दुकानात जाते. एकदा काय झाले, ती नेहमीसारखी आमच्याबरोबर दुकानात येत होती. आम्ही रस्ता क्रॉस केला पण मनू मागे राहिली. तेवढ्यात एक ट्रक येत होता. मनू त्याला धडकणार तेवढ्यात मी आणि दिदी जोरात ओरडलो. मनू ऽ ऽ ऽ . त्या ट्रकवाल्याने जोरात ब्रेक दाबला व म्हणाला, "बिल्ली को साथ लेकर घूमते है क्या?" तो ट्रकवाला निघून गेला. आम्ही मनूला घेतले व घरी सोडले आणि परत दुकानात गेलो. माझ्या मनात खूप धडधड होत होती. वाटत होते की मनूला काही झाले नसेल ना. आम्ही जेव्हा घरी आलो तेव्हा मी तिच्यापाशी गेले व बघितले तिला कुठे काय झाले आहे का. तिला कुठेच लागले नव्हते. मग कुठे माझ्या मनातली धडधड थांबली.

मनू सारखी एका मांजरासोबत भांडण करत असते. एकदा ती नेहमीसारखी एका बाभळीच्या झाडावर भांडत होती. भांडण झाल्यावर ती घरी आली. तेव्हा तिच्या डोक्यात काटा घुसला होता. मी आणि दिदी तिला मम्मीकडे घेऊन गेलो. मम्मीने चिमट्याने तिच्या डोक्यावरचा काटा काढला.

आता आमच्या मनूला तीन पिल्ले झाली आहेत. पिल्ले खूप गोजिरवाणी आहेत. पिल्ले रंगपंचमी दिवशी झाली. आम्ही तेव्हा गावाला गेलो होतो. मला खूप वाईट वाटले कारण आम्ही कोणी नसताना तिला पिल्लं झाली. तिच्या पोटात किती दुखले असेल. ती किती रडली असेल असे मला वाटत होते.

आता आमची मनी चांगली आहे. तुम्ही पाहिलीच असेल आमची मनी. शाळेतच राहते ना ती.

■



## सुट्टी संपली शाळा भरली

सुट्टी संपली शाळा भरली
६ जून तारीख उजाडली

नवे वर्ग नवे कपडे
नव्या वह्या नवी पुस्तके

शाळेची घंटा आता होईल
घरातील कलकल बाहेर जाईल

आता आला नवा चुडिदार
पहिला दिवस फारच मजेदार

मुलांचा कडकडाट मुलींचा चिवचिवाट
नव्या पुस्तकांचा अजब वास

किचनमध्ये आईचे डोळे पाणावले
डबा भरताना उन्हाळ्याचे दिवस आठवले

सुट्टी संपली शाळा भरली
दिवाळीची आई वाट बघू लागली.

**सिमरन पठाण**
**इ. ८ वी**

## माझी शाळा

कमला निंबकर बालभवन
ज्ञानाचे आमचे नंदनवन

छोटेसे आमचे जग इथे
ज्ञानाची उणीव नाही जिथे

छोटी मोठी इथली झाडे
पर्यावरणाचे देती धडे

आम्ही सारे सवंगडी
कधी मस्ती तर कधी खोडी

शिक्षण आणि शिस्त मिळून
दोन्ही आमच्यात यावे जुळून

तळमळीने शिकवत असतात ताई
सरांनाही शिकवण्याची असतेच घाई

शिस्तही आमच्यात असावी तर
मंजूताईंची असते करडी नजर

सुंदर माझी ही शाळा अशी
सांगा पाहू मी विसरेन कशी.

**शिवतेज अभंग**
**इ. ८ वी**

# When I Dialed 100

**Samiksha Dixit**

**Standard 7**

When I was eight years old, I had gone to my uncle's house. One day in the afternoon my mother and aunt had gone to the neighbour's house. My father and uncle were having their lunch in the kitchen. Amit, Sumit and I were playing in the hall. We were playing with the telephone. At that time a TV serial named 100 was very famous. So just for fun we dialed 100 for two or three times. It rang and somebody picked it up, but we didn't speak.

After some time our telephone rang. My uncle came to receive the telephone. There was a policeman on the line. He asked my uncle angrily, "Why are you calling us?" My uncle apologised and said, "Some children were playing with the telephone. Perhaps they dialed the number. I am extremely sorry for that."

Then uncle scolded us and ordered us not to touch the telephone. ■



Akshata Magar

# माझे बाबा

**काजल सस्ते**

**इ. ७ वी**

माझ्या बाबांचे नाव राजेंद्र आहे. माझे बाबा खटाव तालुक्यातील मोळ या गावी शिक्षक आहेत. ते इयत्ता १० वी ला शिकवितात. त्यांनी ही शाळा प्रथम सुरू करण्यापासून मेहनत घेतली. अगदी शाळेला मान्यता आणण्यापासून त्यांनी या शाळेला मदत केली.

माझ्या बाबांनी या शाळेत बारा वर्षे बिनपगारी नोकरी केली. अगदी जिद्दीने व खूप कष्टाने शाळा उभी केली. अगदी शाळेला इमारतही नव्हती पण आज गावाबाहेर अगदी निसर्गरम्य टेकडीवर शाळेची इमारत आहे. बाबांचे विद्यार्थी आजही खूप आदराने भेट घ्यायला येतात व आस्थेने विचारपूस करतात.

मला आजही आठवतात ते दिवस. मी खूप लहान होते. अगदी चार ते पाच वर्षांची असताना बाबांना पगार नव्हता. तेव्हा बाबा सकाळी सातपासून शाळा भरेपर्यंत मुलांची ट्यूशन घेत व शाळा सुटल्यानंतर संध्याकाळी सात वाजेपर्यंत. अगदी गरिबातला गरीब विद्यार्थी शिकून निघावा हे ध्येय असल्यामुळे बाबा ट्यूशनची फी फक्त तीस रुपये घ्यायचे. बाबांना पगार नसल्यामुळे त्यावरच आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालायचा.

आमचे कुटुंब म्हणजे माझी आई, बाबा, भाऊ व आत्याची दोन मुले व मी. माझ्या आत्याच्या घरची परिस्थिती खूप बिकट होती त्यामुळे बाबांनीच आत्याच्या दोन्ही मुलांना शाळा शिकविली. बाबा स्वतः शिक्षक होते त्यामुळे बाबांना शिक्षणाचे महत्त्व माहीत होते.

मी पाच वर्षांची झाले त्यावेळी मला मामाच्या गावी शाळेला ठेवले. मी इयत्ता ४थी पर्यंतचे शिक्षण भिकोबानगर येथे पूर्ण केले. त्यानंतर मला फलटणला आणले व पाचवीपासून कमला निंबकर बालभवन-मध्ये घातले. माझ्या भावाला इंग्लिश मीडिअम स्कूल मध्ये घातले.

माझ्या बाबांनी बारा वर्षे बिनपगारी काढून सुध्दा आम्हा दोघांनाही चांगल्या शाळेत, आमच्या आवडीच्या शाळेत घातले आहे.

आईवर आपण अनेक कविता करतो, वाचतो, ऐकतो. पण 'माझे बाबा' या विषयावर कधीच कोण लिहीत नाही कारण आपल्याला आईच जास्त जवळची वाटते.

**पान ...१९ वर**

# काडी पैलवान! नाही बॉडी पैलवान!


**विपुल गुंडगे**

**इ. ८ वी**

हां! मी खरेच पैलवान आहे. पण माणसे मला काडी पैलवान म्हणतात. पण माणसे काय म्हणत आहेत याकडे मी लक्ष देत नाही. मी दररोज व्यायाम करतो त्याबरोबर मी पूर्ण ४०० जोर मारतो. कोणीही माझे काही वाकडे करू शकत नाही.

माझे बाबा कुस्तीमधले जादुगार होते. त्यांना ऑल इंडिया चँपियनशिप मिळाली आहे. ते कुस्तीमधले डाव मला रोज शिकवतात. एकदा मी सुरवडीमध्ये कुस्तीच्या खेळामध्ये भाग घेतला होता. माझे सर्व मित्र आणि नातेवाईक माझी कुस्ती बघण्यासाठी सुरवडीत आले होते. शाळेमध्ये माझे मित्र रोज माझा उत्साह वाढवायचे आणि मला हरभऱ्याच्या झाडावर चढवायचे. आणि मी पण सांगत असे की माझ्या प्रतिस्पर्ध्याला असे चीत केले आणि तसे चीत केले.

दिवस उजाडला तेव्हा सकाळी मला लवकर जाग आली. रात्रभर मला नीट झोपही लागली नव्हती. मी सकाळी आंघोळ करून तयार झालो आणि देवाचे नाव घेणे



सुरू केले. दुपारी आम्ही आमच्या गाडीतून जायला तयार झालो.

तिथे खूप गर्दी होती. माझे आणि माझ्या प्रतिस्पर्धीचे नाव पुकारले. समोरूनच माझा प्रतिस्पर्धी आला. मी त्याच्याकडे बघितले तर तो माझ्यापेक्षा उंच आणि वजनदार होता. त्याला बघून मला घाम फुटला. पंचाने माझा हात त्याच्या हातात दिला आणि कुस्ती सुरू झाली. पहिल्याच डावात त्याने मला दिवसा चांदण्या दाखवल्या. माझा उत्साह कमी होत होता. दोन दिवसांआधी माझ्या पायाला रनिंगच्या स्पर्धेमध्ये लागले होते. त्यामुळे मी पहिल्या फेरीत लवकर दमलो.

नंतर मी एक दीर्घ श्वास घेऊन माझ्या प्रतिस्पर्ध्याच्या दुहेरी पटाला लागून त्याला खाली घेतले आणि लगेच त्याला मुळी डावावर चीत केले. पंचाने मला विजेता घोषित केले आणि शाबासकी दिली. मी प्रेक्षकांना आणि मित्रांना दाखवून दिले की दिसते तसे नसते म्हणून तर जग फसते.

■

---

**माझे बाबा १७ वरून**

परीक्षेचा निकाल कळल्यावर आई आपले कौतुक करते. पण गुपचुप जाऊन दुकानातून पेढ्यांचा बॉक्स आणणारे बाबा मात्र कोणाच्याच लक्षात रहात नाहीत. चटका बसला, ठेच लागली तर आई गं! हा शब्द बाहेर पडतो पण रस्ता पार करताना एखादा ट्रक जवळ येऊन एकदम ब्रेक लावतो तेव्हा बापरे! हाच शब्द बाहेर पडतो. आपल्याला असे वाटते की आईच आपल्यावर जास्त प्रेम करते. त्यामुळे आपण आईवरतीच जास्त कविता, लेख, निबंध लिहितो. बाबांविषयी लिहायला अवघड वाटते पण एकदा लिहायला लागले की आख्खी वही अपुरी पडते.

■

# गोट्या

**निरंजन चोरमले**

**इ. ६ वी**

दिवाळीच्या सुट्ट्या होत्या. दिवाळीच्या सुट्ट्या म्हणजे शाळा नाही. अभ्यास नाही. फक्त खेळ. आम्ही सगळे मित्र-मित्र मिळून खेळायला जायचे ठरवले. पण खेळायला कुठे जायचे? अचानक गण्या म्हणाला, "जिनिंगमध्ये जाऊ की. असेही तिथं कोण असतं? गार सावली. ना कुणाचा दाब ना मार." तर मग आमचे ठरले. जिनिंगमध्ये खेळायला जायचे. पण कुणाच्याच डोक्यात आले नाही की जिनिंगचा जुना मुकादम आल्यावर डावाचा इस्कूट करून जाईल. पण त्याला कोण भेतंय? गेलूच खेळायला.

होती १५ मुले. ३-४ डाव खेळून डाव अगदी रंगला होता. पण मधनंच कुठनं पणवती घडली. माझा गोट्यांचा पातीदार, गौऱ्या, त्याचा हंटरच गेला आडापाशी. तर हंटर आणायचं काय धाडस होत नव्हतं. पण तेवढ्यात माझा मित्र हर्षा, त्याला आम्ही लाडानं अण्णा म्हणतो, तो आला न म्हणाला, "कारं? डाव का थांबवलाय?" तर सांगितलं, गौऱ्याचा हंटर गेलाय आडापाशी. तिथं लय बेकार अंधार हाय. भ्या वाटतय बबा. अण्णा म्हणाला, अंधाराला भेताय? म्हणाला, माझ्या बरं चला की कुणीतरी. मग मी धाडस करून गेलू. पण छातीत धाकधूक करत होतं. तो पुढं मी मागं गेलू पण हंटर दिसला नाही. पण एक बारीक चमकल्यागत दिसलं. मी दाखवलं. दोघं गेलू. हंटर हातात घेतला न् दिसला सापळा.. मग काय, छातीत पाणीच कालावलं. जी पळत सुटलू, ती परत जिनिंगमध्ये खेळायचा नादच सोडला.

आमच्या घराशेजारी म्हणजे कॉलेजशेजारी एक वाण्यांचा म्हसणवाटा आहे. त्याच्या शेजारीच जुनी कॉटन जिनिंग आहे. तिकडे वेडपटाचे खूप काटाड वाढले आहे. गेल्या आठवड्यात बाया सरपण तोडायला तिकडे गेल्या होत्या. त्या सांगत होत्या की कुत्री काहीतरी खणत होती म्हणून. कुत्र्यांनीच काहीतरी आणून टाकलं असंल.

■


# धूलिवंदनाची मेजवानी

ऋषिकेश जाधव

इ. ७ वी

त्या दिवशी धूलिवंदन होते. आम्हाला सुट्टी होती. नेहमीप्रमाणे मी बाहेर फिरत होतो. दुपारी बारा-साडेबाराच्या दरम्यान मी शेजाऱ्यांच्यांत म्हणजे माझे मित्र पवन व भोलूकडे गेलो. ते व त्यांची सर्व भावंडे लपाछपी खेळत होती. त्यांच्या हट्टापायी मीही खेळू लागलो. दोन चार डाव उलटले. थोड्या वेळाने उन्हाचा चटका चांगलाच जाणवू लागला. भोलूवर राज्य आले. मी व पवनने तेथून जवळच असलेल्या एका जुन्या घराकडे धूम ठोकली.

दोन खोल्यांचे पत्र्याचे दगडी घर. पूर्वी तेथे एक गुजराथी कुटुंब रहात होते. पण काही कारणांनी ते सोनवडीला रहायला गेले. त्यामुळे ते घर एक वर्षापासून बंद होते. त्या घराचे दरवाजे लाकडी होते. मागचा दरवाजा तर वाळवीने पूर्ण पोखरून काढला होता. आम्ही तेथूनच आत शिरलो. पूर्वी तेथे राहणारे कुटुंब तेलाच्या डब्यांचा व्यवसाय करीत त्यामुळे आत तेलाचा उग्र



वास घमघमत होता. मी व पवन त्या काळ्याकुट्ट अंधारात दारामागेच बसलो. तेवढ्यात काहीतरी हललं. अंधूक उजेडात मला ती घोरपड वाटली. आम्ही घाबरून बाहेर निघालो तो नेमका भोलू त्याच वेळी तिथे पोचला. मी एकदम म्हणालो, "अरे, घोरपड हाय तिथं." आम्ही तिघे घाबरत घाबरत आत गेलो. अंधारात काही स्पष्ट दिसत नव्हते. पण घोरपड दिसली. एक फूट लांब व जराशी जाड अशी होती ती. आम्ही बाहेर आलो. पुढची व्यवस्था बघायची होती. म्हणजेच तिला मारायची कशी ते. कारण तेव्हा धूलिवंदन होते ना!

तेवढ्यात आम्हाला लांबून पवनचे पप्पा येताना दिसले. आम्ही त्यांना लांबूनच सर्व सांगितले. ते जवळ येताच आम्हाला कळले की ते सुध्दा पिऊनच आले आहेत. आम्ही त्यांना घोरपड दाखवली. त्यांना काही स्पष्ट दिसत नव्हते वाटते. कारण ते घोरपडीचे जरा जास्तच कौतुक करत होते. मला वाटतेय ते दुसरेच काहीतरी पाहत होते. त्यांनी आम्हाला सांगितले "एक पक्कड व एक लांब काठी घेऊन ये." भोलू पळतच सुटला. सामान हजर झाले. त्यांनी पक्कड आमच्या हातात दिली व घोरपडीला कोपऱ्यात दाबण्याचा प्रयत्न करू लागले. पण उलटेच झाले. ती घोरपड आमच्याच अंगावर धावून आली. आम्ही बाजूला सरलो म्हणून ती शेजारच्या खोलीत गेली. ती शेजारच्या खोलीत जाणे ही गोष्ट चांगली नव्हती. कारण शेजारच्या खोलीत आणखीन अंधार होता. तरीही तिला कोपऱ्यात दाबून धरण्यात त्यांना यश आले. त्यांनी काठी पवनच्या हातात दाबून धरण्यासाठी दिली. व स्वतः जावून घोरपडीचे मुंडके चिमट्यात धरले व तिला बाहेर आणले. बाहेर येऊन बघतो तर काय? ती घोरपड नसून एक घोरपडीचे लहान पिलू होते. त्यानेच आमचे दोन तास खाल्ले होते. शेवट एक दोरी घोरपडीच्या गळ्यात बांधली व तिचे दुसरे टोक शेपटीला बांधले व तिला घरी नेले. थोडा का होईना 'त्यांचा' रात्रीचा बंदोबस्त झाला होता.

'त्यांचा', कारण मी मांसाहार करत नाही.

■

---

> आजकल कहीं भी फूट रहें हैं बम गोले।
> हर इन्सान घबराकर तौबा है बोले।
>
> **सितारा मणेर**

# Mrutyunjay

**Akshata Magar**

Standard 9

When I was in the seventh standard, I asked my mother, "Tell me one book that is very interesting." My mother said, "You must read Mrutyunjay." I asked her what this Mrutyunjay was. She said, "I won't tell you anything. You just read it."

When I looked into our school library I realised that Mrutyunjay was one of the most popular books. So after two months of waiting I got it from the library. When I saw the book I was scared! How was I going to read such a thick book? I started reading with displeasure. But as I read further and further, I started getting interested in it.

The book is about the generous Angaraj Karna, the son of the sun. He was very intelligent, with golden earrings and a shell.

Karna was the best friend of Kaurav prince Duryodhana and although he was Kunti's son, he spent all his life as *Suta-putra* (a charioteers' son). He was a great warrior but people saw him only as a *Suta-putra*. This hurt Karna.

When I read all this I too felt hurt and felt that I was with him. I experienced all the incidents with him. The personality of Karna came alive in front of my eyes.

I didn't know how hours passed when I read this book. I was totally immersed in the book. I didn't hear anything when I was reading.

Shivaji Sawant has written this book and has tried to give a new prespective about Karna.

I read the complete book like mad. I didn't want to stop reading. I thought, "Let anything happen in the world, I won't put the book down!" I had got a pain in my neck. But I didn't stop because I was curious about what would happen next.

When the book ended my mother asked me how I felt. I didn't say anything because there were no words in my dictionary for this book.

When someone asks me how Mrutunjay is, I tell them, "Just read it!" In the end I will only say, "Jaytu Karna jaytu."

■

# My First Cricket Match

**Ruturaj Kadam**

Standard 9

I was in the seventh. Our Diwali vacation was going on. We went to our hometown Giravi. Everybody was happy because it was Diwali. I was happy too. I heard that villagers were planning two cricket matches, in the joy of Diwali. My elder brothers had taken part in a match. One place was empty in their team so they gave me an apportunity to play in their team.

Our match was on the second day. Our team lost the toss. The opposite team decided to bat first. Somehow everybody knew that the match would be interesting. The other team's beginning was good. They made 58 runs in 7 overs. I didn't bowl in the first 10 overs. But our captain showed confidence in me and gave me one over to bowl. But luck was not with me. The batsman hit two sixes and also one boundary in that over. I disappointed everybody. I had given away 18 runs in one over. Our winning was becoming more and more difficult.

We needed 108 runs in 15 overs to win that match. The beginning of our batting was completely unexpected. We lost our first wicket on the first ball of our inning. But the 63 runs made by the next two batsmen was a ray of hope. Our fifth wicket fell on 73. I was the next batsman. I drove first ball between covers and got four runs.

I was playing on 23. We needed 20 runs in two overs and three wickets were still in our hands. I was on the strike. I was ready. A new bowler bowled the first ball. I wanted to hit that ball between point and cover, but I missed it and the ball went in the keeper's hands. There was a small sound. The bowler appealed loudly. But the umpire gave not out. I somehow knew that there was a small snick. So I started walking towards the pavilion.


Everybody was shocked. Nobody knew what had happened. But I knew I was out. Maybe the umpire hadn't heard the sound, but I was surely out. When I was walking my father looked at me and smiled. After that we lost our two wickets quickly and lost the match by 10 runs.

**see page 28**

# बैलांची शर्यत

**कमलेश गुंजवटे**

**इ. ८ वी**



रविवारचा दिवस होता. मी व भैय्यानी मित्राच्या वाढदिवसाला जातोय असं घरी सांगून गाडीला किक मारली. आमची गाडी पंढरपूर रोडनी तराट निघाली. आम्ही थेट बरड गाठलं. कारण आम्हाला बरडचा शर्यतीचा अड्डा बघायचा व्हता. मनात तर लय भ्या व्हतं. घरच्यांना कळलं तर ठोकं पडणार व्हतं. पण बैलं बघितली नी आमच्या आंगातलं भ्या तर निघूनच गेलं.

तेवढ्यात पहिल्या गटाचा पुकार झाला व आम्ही फाटीपासून थोड्या अंतरावर उभे ऱ्हायलो. गटामध्ये एकूण पाच गाड्या होत्या. त्यात जी पयली गाडी येनार व्हती ती सेमीफाइनलला बसणार होती व सेमी फाइनलच्या पयल्या गाड्या फायनलला बसणार होत्या. बक्षिस मोठं असल्यामुळे लांब-लांबच्या गाड्या आल्या होत्या. बघ्यांची गर्दीपण लय व्हती.

पंचानी झेंडा टाकला. बैल वाऱ्याच्या वेगाने पळत असताना अचानक एक गाडी आपली फाटी सोडून दुसऱ्या फाटीत गेली. दुन्ही गाड्या एका फाटीत आल्यामुळे मागची बैलं बुजली व एक गाडी फाटी सोडून गर्दीत घुसली. माणसांची पळापळी झाली. एका माणसाच्या पायावरनंच गाडी गेली. हे चित्र बघून आम्ही तर लय भिलू व थोडं लांब थांबून बघू लागलो. या रेसमध्ये १६ गट होते. त्यातल्या १२ व्या गटामध्ये आमच्या आमल्याची गाडी होती. आमल्या म्हणजे माझा मावसभाव हाय.

मग त्याच्या गाडीबरोबर आम्ही बैलं धरून जिथनं सोडत्यात तिथं गेलू. सगळ्या गाड्या येस्तवर आम्ही बैलांना तापवाय लागलू. मग सर्व गाड्या आल्यावर सर्वांनी गाड्या आपापल्या फाटीवर उभ्या केल्या. बैलं तापावल्यामुळे आवरत नव्हती व सारखी लॉबी होत होती (ज्या रेषेवरून गाड्या सोडतात ती मोडत होती) त्यामुळे झेंडेवाला पंच वैतागला. शेवटी कशीतरी लॉबीत बैल आणून झेंडा पडला व पऽऽळ सुद्या, पऽऽळ सर्जा म्हणत डायवरांनी वरडत गाड्या तराट सोडल्या. त्यात एक कोसा बैल होता. त्यो लयच आवकळ होता. त्यानं किरान घेतलं आन् दुसऱ्याच फाटीत शिरला. त्याचा डायवर खाली पडला. पाय गुतल्यामुळं त्याला फरफटतच नेला.

शर्यत बघण्याच्या नादात साडेसहा वाजल्याचे आमाला कळलेच नाय. फाइनल तर बघायची हुती पण घरच्यांचं पण भ्या हुतं. त्यामुळं नकू असताना पण घरला आलू. पण ती शर्यत मी कधीच विसरणार नाय.

(फाटी-ट्रॅक, कोसा-काळा, आवकळ-अवखळ, किरान-उडी)

■

---

तेज बारीश आई, जाएँ कहाँ? कहाँ खेलें?
माँ ने कहा, चलो आज कॅरम खेलें।

**प्रितम राऊत**

सुशांत सर से सीखी मैंने कागज की डलिया
उसमें रख्खी ढेर सारी मोगरे की कलियाँ।

**ओंकार कदम**

# My Grandma

**Pranjali Bhujbal**

Standard 9

My Aaji's name is Kusum. She is 66 years old. Her hobbies are to make different dishes, listen to the radio, and go for a walk at 5 o' clock in the morning. She also likes to visit different places, espesially temples and historical monuments. She is always humming to herself.

My Aaji was born in Wai. Her name was Kusum Zore. Her father's name was Krishna and mother's name was Radha. My Aaji had 4 sisters and 3 brothers. She was the fourth child of her parents. Her father owned a sweet shop. He used to make varieties of Mithai and sell them. My Aaji completed her schooling till seventh class. She wanted to study more but the times were hard. So her dream of studying further remained incomplete.

On 23rd April 1964 my Aaji got married to my Ajoba. His name was Bhagwanrao Bhujbal. He was a teacher. First they lived in Taradgaon. Then my Ajoba was transferred to Vakhri. He taught English there. He went to Vakhri on bicycle everyday for eleven years. And then he was transferred to Phaltan. There was a small room in Pawargalli where they lived. My Ajoba taught Hindi and Hockey in Yashwantrao Chavan High School.

My Aaji had 3 sons. The eldest is Snajay uncle, second is my father Satish and the youngest is Sachin uncle. They studied in Phaltan and came first in their school. Later my older uncle and my father went to Pune for their education and they became civil engineers. My younger uncle became a teacher of Science and Maths. Because of this my Aaji and Ajoba were very happy.

Aaji always told us about the many experiences of her life. She says that those days were very hard. My Ajoba's monthly income was only 60 rupees. in 1968. So everybody worked hard for the family and children's education. When my Aaji told her good experiences she told about our house. Earlier they lived in a single room but in 1983 they built a new house in Vidyanagar. She says that for this house my Ajoba and uncle worked very hard. Ajoba took extra classes to return the loan and when the new house was built, her dream came true. It was the happiest thing for her.

She was also very happy when her eldest son got a new job at the age of 18 and his income was 2000 rupees. Because of this Ajoba got some relief.

My Aaji is now happy and satisfied. She had also done the 'charidham' yatra. She says that she has got responsible sons, sensible daughter-in-laws and lovable grandchildren. So she is happy and is busy in her hobbies and thanks the God for everything.

Ajoba is no more now. "But his teachings and blessings will always be with us to encourage us in life", says my Aaji.

■

---

From page 24

**My First Circket Match**

On one side I was feeling bad about our defeat but on the other I felt proud of my decision.

At supper time my father called me and gave me a hundred rupee note without saying anything. I knew that it was a reward for my honesty.

That was my first cricket match and I can never forget it. It will always be my ideal.

■

# पिसांच्या शोधात

**अभिषेक शिंदे**

**इ. ९ वी**

"मार्चच्या ३ व ४ तारखेला आपण सर्व नववीचा वर्ग विंचुर्णीला फिरायला जाणार असून तेथे मुक्काम करणार आहोत." अशी खुशखबर सर्वप्रथम आम्हाला मधुराताईने दिली. 'सहल' हा शब्द एखाद्याच्या चेहऱ्यावर नकळत हास्य फुलवणारा आणि मौज, मज्जा, मस्ती, धमाल या शब्दांना उजागर करणारा आहे. ही सहल अशीच काहीतरी होती. नेहमीपेक्षा वेगळी नक्कीच, आणि आमचा टॅलेंटेड वर्ग पहिल्यांदाच मुक्कामी जाणार होता.

पण तरीही माझ्या मनात विचार येत होता की खरेच ही सहल अविस्मरणीय ठरेल? म्हणजे विंचुर्णी सारख्या रखरखीत कोरड्या माळरानावर काय मज्जा असेल? धमाल, मस्ती करता येईल का? माझ्या या विचाराला वर्गात थोड्या-बहुत प्रमाणात प्रतिसाद नक्कीच होता. पण दुसरीकडे असेही वाटत होते की ही एक सुवर्णसंधी गमवायला नको. कारण विंचुर्णीच्या माळावर हिरवी समृध्दी नांदवणाऱ्या एका व्यक्तीला आम्ही भेटणार होतो. या कोरड्या प्रदेशाचा त्यांनी पूर्णपणे कायापालटच केला आहे. त्यांच्या बागा, विविध प्रकल्प, तळी, नवनवीन योजना दुसऱ्या कुठल्याही ठिकाणी पहावयास मिळणार नाहीत. मंजूताई म्हणतात ते खरेच होते, की अशा माणसांना आयुष्यात एकदा तरी भेटावे, त्यांच्याशी चार शब्द गप्पा माराव्यात. अशी माणसे नशिबात सारखी सारखी भेटत नाहीत.


मी सांगतोय त्या व्यक्तीला कदाचित तुम्ही ओळखत असाल. ते म्हणजे बाबुलाल गांधी. जर ओळखत नसाल तर खरेच या माणसाला भेटा अशी विनंती मी करतो. मगच तुम्हाला कळेल मंजूताई आणि त्यांच्यापाठोपाठ मी त्यांचे का एवढे गोडवे गातो आहे ते.

आज ही व्यक्ती ८२ वर्षांची आहे. एक डोळा पूर्णपणे गेला आहे. तरीही त्यांचे काम, जिद्द व चिकाटी आणि विशेष म्हणजे नवीन कल्पना काढून राबवण्याची ताकद कायम आहे. त्यांनी आज केळी व चिक्कूच्या मोठमोठ्या बागा, तीन शेततळी व एक भला मोठा २५ एकरात वसलेला पाझर तलाव उभारला आहे. आहे. शेतात विविध प्रकारची पिके ते आज पिकवतात. मला ज्यांची नावे सुध्दा माहीत नाहीत अशा पध्दतींनी ते पिके लावतात.

याच बाबुलाल गांधींच्या शेतात आम्ही पक्षीनिरीक्षणास जाणार होतो. आम्ही विंचुर्णीला

सायकलीवरून गेलो. गेल्या गेल्या मंजूताईंनी आम्हाला काही पक्षी दाखवले. तिथेच मुलांना विविध पक्ष्यांची पिसे सापडायला लागली आणि काय झाले काय माहीत, सगळेजण तेव्हापासून पिसांना जणू सोन्याची किंमत आल्यासारखे पिसे शोधू लागले. आम्ही खरे तर पक्षी बघायला आलो होतो पण पोहोचल्यापासून अंधार पडेपर्यंत पक्ष्यांपेक्षा त्यांच्या पिसांचेच महत्त्व वाढत जात होते असे म्हणायला हरकत नाही. रात्रीपर्यंत सगळ्यांकडे, विशेषतः मुलींकडे रंगीबेरंगी पिसे जमा झाली होती.

रात्री आम्ही लांडगे, कोल्हे, विविध प्राणी, कीटक व पक्ष्यांचे आवाज ऐकायला बाहेर पडलो. या दरम्यान मात्र पिसांची शोधयात्रा संपुष्टात आली होती. रात्रीच्या वेळी पिसे सापडणे अशक्यच होते. सगळेजण आपापसांत गप्पा मारण्यात आणि मधूनच ओरडणाऱ्या कुत्र्यांचा आवाज ऐकण्यात गुंतले होते. पण खरे तर असा कुत्र्यांचा आवाज आम्हाला फक्त एकदाच आला. बाकीचा सगळा काळ आम्हीच मोठ्यामोठ्याने बोलत होतो.


अभिषेक

आम्ही जी काही मज्जा, मस्ती केली ती या रात्रीच्याच वेळी. फिरून आल्यानंतर सगळेजण गार हवेत गप्पा मारत होतो. मधूनच कुणीतरी रात्री १२ वाजता सायकल चालवायला सुरुवात केली. आणि हळूहळू सगळ्यांनीच त्याचे अनुकरण केले.

या सायकल फेरीनंतर सगळेजण खोलीत गेले आणि तेथेही या टॅलेंटेड वर्गाने आपले नेमबाजीतील टॅलेंट दाखविले. अर्थातच यासाठी निशाणा होता माणूसच पण हत्यार होते उशी. या उशांच्या मारामारीचा तिन्ही शिक्षिकांना वैताग आला. त्यामुळे उशांचा खेळ कल्पितातार्इंनी संपुष्टात आणला आणि थोडा झोपण्याचा प्रयत्न केला. पण हा आमचा वर्ग कसला झोपतोय! सगळेजण बाहेर आले. काहीजण बाहेर ट्रॅक्टरवर बसून गप्पा मारत होते. ट्रॅक्टरवर जागाच उरली नव्हती बसायला. मग बाकीचे खुर्च्या ट्रॅक्टरभोवती घेऊन गप्पाटप्पांत सामील झाले.

शेवटी १ वाजता आम्ही परत आत गेलो. बेडवर गप्पा मारत बसलो. तिथेही गोंधळच. शेवटी कल्पितातार्इंनी जबरदस्ती करून सगळ्यांना झोपायला सांगितले. मधुराताईने सगळ्या लाईटस् घालवल्या व त्या दोघीही झोपल्या. पण तरीही आम्ही पहाटेच्या साडेतीन वाजेपर्यंत जागे होतो. त्यानंतर खोलीत पूर्ण शांतता होती. पण तरीही जवळजवळ सगळे जागे होते. हेही एक टॅलेंटच ना?

दुसऱ्या दिवशी सकाळी दात घासून आंघोळीऐवजी फक्त तोंडे धुवून आम्ही चहा प्यायला गेलो. चहापाण्यानंतर आम्ही पुन्हा पक्षीनिरीक्षणाला गेलो. यावेळी जास्त पक्षी काही आम्हाला दिसले नाहीत. मात्र मोर भरपूर दिसले आणि विविध पक्ष्यांची इतकी सुंदर सुंदर पिसे सापडली की त्याला नक्कीच सोन्याचा भाव द्यावा अशी.

कल्पितातार्इंनी तर त्यांच्या टोपीत पिसे खोवून ठेवली होती. त्या दिमाखात सगळ्यांना दाखवत होत्या. मोराची २-३ फूट लांबीची पिसे मुले दप्तराला लावून हिंडत होती. हा काळच पिसांच्या शोधयात्रेला पूरक होता. सगळ्यांकडे आता कालच्यापेक्षा दुप्पट पिसे जमा झाली होती. तरी पिसांची हाव काही भागेना.

फिरता फिरता मुले कवठाच्या झाडापाशी पोचली. काही मुले कवठे झाडावर मारून फोडून ती खात होती. ही फोडाफोडीची कल्पना कुणास ठाऊक का रंजक वाटली असावी आणि सगळे खाली पडलेली असंख्य कवठे बुंध्यावर फोडू लागली. बुंध्यावर इतकी पटापट कवठे आदळून फुटत होती की बस्स! नशिबाने कोणाला काही लागले नाही. या खेळातून इतका रंजक आवाज निघत होता की त्यामुळे मुलांना आता मुलीही साथ देत होत्या. शेवटी कसाबसा हा खेळ थांबवून आम्ही केळीच्या बागेत शिरलो.

मंजूताईंनी एक खेळ काढला. केळीच्या बागेच्या एका बाजूकडून सुरुवात करून जो पहिल्यांदा दुसरीकडे पोहोचेल तो विजेता होता. हे काही सोपे नव्हते. मध्येच केळीची पाने, खाली पडलेले घड व ठिबक सिंचनाच्या पाईपचे अडथळे होते. पण हा खेळ खेळायला मजा आली.

मग एका ठिकाणी कोणालातरी पिक्का केळीचा घड सापडला. सगळ्यांनी त्याचा अक्षरशः फडशा पाडला. पुढे असेच अनुकरण चिक्कूच्या बागेत झाले. खाली पडलेले, पाखराने टोचलेले भरपूर चिक्कू एखाद्या झाडाखाली दिसले की तेथे आम्ही बसायचो आणि चिक्कू खायचो. आणि तेथे संपले की लगेच दुसरे झाड आहेच.

केळीच्या बागेतून चिक्कूच्या बागेत असे खात-खात आम्ही शेवटी घरी आलो. तेथे आम्ही पोहे दही असा नाष्टा केला. अचानक याच वेळी ट्रॅक्टरमधून फिरण्याची कल्पना निघाली. ती सगळ्यांना आवडलीही. त्याप्रमाणे आम्ही ट्रॅक्टरमध्ये बसलो. तो सुरू होताच मज्जा येऊ लागली. पुढे खडबडीत रस्त्यावर तर अजूनच. ट्रॅक्टर इतका हळू जात होता की सगळी मुले खाली उतरत होती. आसपासच्या चिंचेच्या झाडावरून चिंचा काढून खात होती. आणि पुन्हा चालू ट्रॅक्टरमध्ये बसून इतरांना वाटतही होती. थोडे पुढे जाऊन माधवीताईने ट्रॅक्टर थांबवला. तिथे इतकी वेगवेगळी पिसे होती की बास! इतर पिसांपेक्षा अलगच होती. सगळ्यांनी ती गोळा केली. पिसांची ही शोधयात्रा थांबतच नव्हती.

ट्रॅक्टरवरचा राऊंड झाल्यानंतर शेवटी आम्ही जेव्हा घराजवळ थांबलो तेव्हा ट्रॅक्टर गचकन थांबला व उभे असणाऱ्यांचा सगळा लोंढा ट्रॉलीत पडला. ती मज्जा बघणाऱ्या मंजूताई आणि मधुराताई खळखळून हसू लागल्या.

या ट्रॅक्टर सफरीनंतर मंजूताईंनी सगळ्यांना निघायला सांगितले. गाडीत बॅगा भरून चार-पाच मुले घेऊन त्या फलटणला रवाना झाल्या. मागून आम्ही सगळे निघालो. कोणाचीही परत जाण्याची इच्छा नव्हती. पण सगळे निघाले. सायकलीवरून प्रवास असल्याने आम्ही मजा करतच फलटणला पोहोचलो. आणि या अविस्मरणीय सहलीचा अंत झाला.


खरच जर मी गेलो नसतो तर या विलक्षण सहलीचा, पिसांच्या शोधयात्रेचा, चिक्कू-केळीच्या आस्वादाचा, कवठांच्या फोडाफोडीचा, उशांच्या मारामारीचा आणि महत्त्वाचे म्हणजे बाबूलाल गांधींना भेटण्याचा मौका मला आयुष्यात कधीच अनुभवायला मिळाला नसता. आणि मी किती पश्चाताप केला असता कुणास ठाऊक!

■

# चाळ

प्रथमेश इनामदार

इ. ९ वी



खरे तर चाळ म्हणले की आपल्याला आठवते ती पु. लं. ची बटाट्याची चाळ आणि जुन्या चित्रपटातून येणारी चाळीची दृश्ये. कारण आता वास्तवात त्या संस्कृतीचे फक्त अवशेषच उरले आहेत.

या संस्कृतीचा उगम झाला तो कापड गिरण्यांच्या काळात. याच काळात मुंबईची आर्थिक भरभराट होत होती. व्यवसाय, नोकरीच्या मायानगरीत कोकणी, घाटावरील लोक पाय रोवण्याचा प्रयत्न करीत होते. याच काळात कमी पैशात राहण्यासाठी हव्या असलेल्या गरजेतून चाळीचा जन्म झाला आणि यातूनच आकाराला आली ती वैशिष्ट्यपूर्ण चाळ संस्कृती.

चाळींमध्ये राहणारा हा वर्ग कनिष्ठ किंवा मध्यमवर्गीय होता. रोज घाम गाळल्याशिवाय तोंडात घास पडत नव्हता. तरीही या वर्गाने आपली स्वतःची सांस्कृतिक ओळख जपली होती. पोवाडे,

भारूडे, नाटके या कलांना जिवंत ठेवले होते. यातूनच कित्येक कसलेले अभिनेते निर्माण झाले. जुन्या साहित्यातून याची मनोहारी वर्णने येतात. या नाटकांतून, नृत्यांतून कामे करताना वर म्हणल्याप्रमाणे कित्येक चांगले अभिनेते झाले पण कित्येकांच्या अंतरंगातील कलेची आग कारखान्यातील कोळशाची भट्टी पेटवताना विझूनही गेली असेल. स्वातंत्र्य चळवळीतही याच वर्गाने मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. नंतरही अनेक छोट्यामोठ्या सामाजिक चळवळींनासुध्दा याच वर्गाने जिवंत ठेवले.

एक लक्षात राहणारे आंदोलन म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचे. १९५४-५५ पासून असंतोष धुमसत होताच. फक्त एकाच ठिणगीची आवश्यकता होती. ती पडली आणि मराठी माणूस पेटून उठला. समाजातल्या १०५ असामान्यांनी महाराष्ट्राच्या वेदीवर आपले प्राण आर्पिले. हे सर्व येथे आठवण्याचे कारण म्हणजे प्रत्येक दिवशीच्या आंदोलनाचे डावपेच चहाच्या टपरीवर, सार्वजनिक कट्ट्यांवर रचले गेले असतील हे आठवून अंगावर रोमांच उभे राहतात.

हळूहळू या वैभवाला उतरती कळा लागली. प्रामुख्याने १९८० नंतर कापड गिरण्या, पारंपारिक उद्योग बंद पडत गेले. उद्योगात यांत्रिकीकरणाची लाट आली. गिरण्यांच्या जागेवर इमारती उभ्या राहिल्या. सामान्य माणसांनी गावाकडची वाट धरली. चाळींवर फ्लॅट संस्कृतीचे आक्रमण झाले. अजूनही काही ठिकाणी अथांग सागरातील बेटांप्रमाणे चाळी आपले अस्तित्व टिकवून आहेत. आमचीही चाळ अशीच! जाताक्षणी आपली वाटणारी! माणूसकीचा ओलावा टिकवून असणारी. घरेही फार मोठी नव्हती. पण पाऊल ठेवताच नाळ जुळते. तेथे पोहचताच मी प्रथमेशचा 'पत्या' होतो व घरापर्यंत पोहोचविला जातो.

घराबाहेरच्या नळावर पाय धुताना आजोळचे वात्सल्यच न्हाऊ घालते आहे असा भास होतो. या क्षणानंतर किमान एक ते दीड महिना मला फिकीर नसते. दर सुट्टीत माझा हाच कार्यक्रम असतो. दुसऱ्या दिवशीपासून माझ्या आजी आजोबांना काय करू आणि काय नको असे होते. आणि अनेक खाद्यपदार्थांचे प्रयोग माझ्यावर सुरू होतात. भेटायला येणाऱ्यांची रीघच लागते. प्रत्येकजण आपापल्यापरीने विचारपूस करीत असतो. ही माणसे वेगवेगळ्या धर्माची, भाषेची, स्वभावाची असतात. पण भेटताना मात्र आपलेच कुणीतरी भेटल्याचा भाव डोळ्यात चमकत असतो. काही वेळेला राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयांवर तावातावाने वादही घातले जातात. पण मग चर्चा संपल्यावर घरी चहाला येण्याचे निमंत्रणही मिळते. इथली माणसे ही अनेक राज्यांतून आलेली असल्याने प्रत्येकाची संस्कृती मिळून एक वेगळीच संस्कृती तयार

होते. तसेच भाषेचेही. इथली भाषा म्हणजे सर्व भाषांची सरमिसळ आहे. मराठी, हिंदी, कानडी, गुजराती, तेलगू या भाषांमधील शब्दांचे मिश्रण इथल्या मराठीत केले जाते. सुरुवातीला आपल्या कानाला खटकते पण मग नंतर सवय होते.

दुपारच्या जेवणानंतर चाळ शांत असते. काहीजण वामकुक्षी घेत असतात, काही ठिकाणी मात्र मुलांचा गोंगाट ऐकू येत असतो. पण गप्पांना खरा बहर मात्र संध्याकाळचा. त्यावेळेस चाळीत मधल्या काळात घडलेल्या घटनांचे रसरशीत, रोचक पध्दतीने वर्णन केले जाते. काही वेळेला राईचा पर्वत देखील होतो. या गप्पाही ऐकण्यासारख्या असतात. कारण प्रत्येकाची भाषा, मुद्दा पटवण्याची शक्ती, आकलन शक्ती वेगवेगळी असते. तरीही या संभाषणातून मधल्या काळातील चाळीचे बातमीपत्र समजते. कधी आनंद, कधी हळहळ अशा प्रकारच्या संमिश्र भावनांचे तरंग उमटतात. या गप्पांमधूनच विस्मृतीत गेलेले लोक भेटतात. या संभाषणातूनच गत काळाच्या आठवणींचा पट उलगडतो.

संध्याकाळी मामा आल्यावर या नाट्याचा दुसरा अंक सुरू होतो. मामाकडून सतत विविध विषयांवरचा ज्ञानाचा ओघ सतत सुरू असतो. या चर्चाही खेळीमेळीच्या वातावरणात पार पडतात. यात कुठलाही आवेश, आक्रमकता नसते. यातूनच नकळतपणे मोलाचे तत्त्वज्ञानही कळते.

याच सुमारास जेवणाचे बेतही ठरत असतात. मग व्हरायटीची फर्माइश होते. सगळ्या पदार्थांची परीक्षा करण्याची जबाबदारी माझी असते. वय होऊनही आजीचा उत्साह जबरदस्त असतो. कधीमधी बाहेरचे पदार्थ आणले जातात. पण आजीच्या प्रेमळ हाताची चव मात्र त्यांना कधीही येणार नाही. गप्पांचा फड रंगवत त्या सुग्रास भोजनावर ताव मारला जातो. याच वेळेस आजूबाजूच्या घरातूनही वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे वास येतात. त्या सर्व वासांचा मिळून एक वेगळाच वास तयार होतो. सर्वांची जेवणे आटोपल्यावरती पुन्हा एकदा सामुदायिक गप्पांचा फड रंगतो. यात दिवसभराची उजळणी केली जाते. कधी आनंद, तर कधी ही सिस्टिमच बेकार आहे असे सार निघते. कुणीतरी वॉक करायला जाते, कुणाच्या घरातून टी. व्ही., म्युझिक सिस्टिमचे आवाज येत असतात. माझा मामा आणि मी गाणी ऐकत रात्री उशिरापर्यंत गप्पा मारत असतो.

दुसऱ्या दिवशी शेजारच्या ग्रंथालयाच्या रूपाने माझ्यासाठी अलीबाबाची गुहा खुली होते. अर्थातच मला कसलेही भान राहत नाही. निवडलेली पुस्तके घरी पोहचती होतात. माझ्याभोवती अनेक पुस्तके ठेवली आहेत आणि मी अधाशासारखा त्यांचा फडशा पाडतो आहे, हे चित्र डोळ्यासमोर आणा.

अशातच सुट्टीचे दिवस पायाखालची वाळू सरकावी तसे मागे पडतात. संध्याकाळ झालेली असते. सामानाची बांधाबांध चालू असते. मी मात्र अर्धे राहिलेले पुस्तक पूर्ण करण्याच्या खटपटीत असतो. ज्यांचे ग्रंथालय आहे ते माझ्या चेहऱ्यावरचे भाव ओळखून नंतर पाठवून दे असे सांगतात. माझ्या डोळ्यासमोर महिन्या-दीड महिन्याचा पट उभा राहतो. आणि हे आता पुढच्या सुट्टीपर्यंत मिळणार नाही याची हुरहुर वाटते. आई, आजी, मामी भरल्या डोळ्याने प्रवासात घेण्याचे पदार्थ करत असतात. त्यात आजीचे प्रेमळ वात्सल्य भरलेले असते. निघताना प्रेमळ संवाद होतो. पाठीवर प्रेमभराने थोपटले जाते. चाळीतील मंडळीही रिक्षापर्यंत पोहोचवायला येतात. सर्वांच्या डोळ्यात पाणी साकळलेले असते. निरोपाचे हात हलवताना माझ्याही डोळ्याच्या कडा पाणवतात.

■

## www.pragatshikshansanstha.org
## या संकेतस्थळाविषयी

प्रगत शिक्षण संस्थेने नुकतेच आपल्या संकेत स्थळाचे (वेबसाईटचे) नूतनीकरण केले आहे. या स्थळाचे वैशिष्ट्य म्हणजे संस्थेच्या सर्व कामाच्या माहितीबरोबरच संस्थेचा रंजक इतिहास आणि कमला निंबकर बालभवनमध्ये सध्या चालू असणाऱ्या उपक्रमांचा वृत्तांत येथे वाचायला मिळतो. या उपक्रमांबद्दल वाचून कोणाला प्रतिक्रिया लिहायची असेल तर तीही जागा येथे आहे.

या संकेत स्थळावर शिक्षकांनी केलेल्या संशोधनाचे अहवाल वाचायला मिळतील. कमला निंबकर बालभवनच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक प्रकल्प पहावयास मिळतील व आत्ता तुम्ही वाचत आहात तो नवनीतचा अंकही रंगीत चित्रांसह तुम्हाला पहावयास मिळेल. तुम्हाला किंवा तुमच्या स्नेह्यांना आमच्या बालवाडी शिक्षणाबद्दल विशेष माहिती हवी असेल तर तीही येथे थोडक्यात मिळेल.

मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये या संकेतस्थळावरच्या सर्व गोष्टी वाचता येतील.

संगणक नवसाक्षरांनासुध्दा पहायला अतिशय सोपे, रंजक आणि भरपूर छायाचित्रांनी जिवंत झालेले हे संकेत स्थळ एकदाच नव्हे तर पुन्हा पुन्हा भेट देण्यासारखे आहे. संस्थेला देणगी देण्यासाठी आवश्यक ती माहिती येथे ‘आपला सहभाग’ मध्ये मिळेल.

www.pragatshikshansanstha.org


**मंजिरी निमकर**

Search..

प्रगत शिक्षण संस्था

English Marathi

पहिले पान | संस्थेची ओळख | संस्थेचे कार्य | संशोधन व संसाधने | आपला सहभाग | संपर्क



जिथे कोणत्याही बालकाला
शिक्षणापासून
वंचित ठेवले जाणार नाही
किंवा
अशा शाळेत घातले जाणार नाही
जिथे त्याच्या भरारीला
वेसण बसेल
अशा एका जागाचे स्वप्न
आम्ही उराशी बाळगले आहे